**वि.दा.क्रं.५६/२०२२**
**भागीरथाबाई वि.नामदेव**

**<u>नि.क्रं. ०१ खाली आदेश</u>**

सदरकामी वादीने दिलेला दावा दुरुस्तीचा अर्ज दि.१९/०७/२०२४ रोजी अंशत मंजूर झाला. त्या आदेशाविरुध्द मा.उच्च न्यायालयात रिटयाचिका केली असल्याचे वादींनी नि.क्रं.४३ अन्वये दि.१९/०९/२०२४ रोजी कथन केले. वादीनी दाव्यात दुरुस्ती करण्यास अपील दाखल करेपर्यंत मुदत मागितली. ती त्यांना देण्यात आली. मात्र निशाणी ४३ वरील वादीच्या कथनानुसार त्यांनी रिटयाचिका दाखल केली आहे. त्यामुळे दाव्यात करावयाची दुरुस्ती करण्यासाठी त्यांना दिलेली मुदत रिटयाचिका दाखल केल्याक्षणी संपलेली आहे. आज अखेर वादींनी दाव्यात दुरुस्ती केलेली नाही.

वादींनी रिटयाचिका दाखल केली असल्याने त्या याचिकेमध्ये मा.उच्च न्यायालयाने निशाणी ३७ या दुरुस्ती अर्जाच्या अनुषंगाने कोणते आदेश केले हे वादींनी समक्ष किंवा वकीलामार्फत हजर होऊन सांगणे गरजेचे आहे. त्याबाबतचा पुरावाही देणे गरजेचे आहे. वादींनी याचिका दाखल केल्याबाबत कोणताही पुरावा दिलेला नाही. मात्र त्यांच्या निशाणी ४३ वरील कथनांवर विसंबून न्यायाल्याने त्यांना परवानगी दिली होती. सदर वादींनी याकामी मा.उच्च न्यायालयाकडून पुढील तारखेपर्यंत आदेश न आणल्यास वादीच्या गैरहजेरीस्तव निशाणी ३७ वर झालेला आदेश तजवीज न केल्याने आणि वादीच्या अनुपस्थीतीमुळे दावा काढून टाकण्यात येईल.

स्वाक्षरीत/-

**[एस.एन.सरडे]**
**दिनांक २६/०६/२०२५.** **दिवाणी न्यायाधीश व. स्तर,**
**अहदमपूर.**